Golden Research Thoughts
Vol -2 , ISSUE –10, April.2013
ISSN:- 2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

संत तुकारामांची समाजभक्ती आणि अभंगगाथेतील प्रगतीशील संवेदना

महेश मंगनाळे

मराठी विभाग श्री संत गाडगे महाराज महाविद्यालय, लोहा ता.लोहा जि.नांदेड (महाराष्ट्र)

सारांश :-

महाराष्ट्र प्रदेश व मराठी मनाच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक जडणघडणीत महानुभाव, नाथ, वारकरी, वीरशैव, दत्त, समर्थ या विविध संप्रदायातील भक्ती साहित्याचे विशेष व महत्त्वपूर्ण योगदान आहे. संत ज्ञानेश्वरांनी लोकभाषा मराठीमध्ये ग्रंथरचना करुन सर्वसाधारण व्यक्तीस अध्यात्मिक आनंद देऊन एका अर्थाने या क्षेत्रात अध्यात्मिक लोकशाही स्थापन करण्याचे युग प्रर्वतक कार्य केले. समाजातील सर्व स्तरातील लोक, सर्व जाती-पंथातील स्त्री-पुरुष या मार्गाने पारमार्थिक ज्ञानमार्ग अनुसरू लागले. संत नामदेव, संत चोखोबा, संत बहिणाबाई, संत तुकाराम, संत एकनाथ, संत कर्ममेळा, संत सेना, संत सावता, संत नरहरी, संत बंका, संत जनाबाई, संत रामदास, संत वेणाबाई यांचे जीवन-कार्य आणि वाङ्मय म्हणजे याच दिशेने झालेली विकासात्मक वाटचाल आहे. महाराष्ट्रात भक्तिपंथाच्या कार्यारंभापूर्वी अनेक समूह देवी-देवता, कर्मकांड, व्रत-वैकल्य आदींमुळे समाज विघटीत अवस्थेत जगत होता. तसेच उभयंतांमध्ये द्वंद होते. त्यामुळे सामाजिक सलोखा, शांतता आणि स्थैर्य यास तिलांजली मिळत होती. या प्रदेशात राहणारा मानव समूह एकाच छत्राखाली आणील त्यांना संघटीत करुन सामाजिक ऐक्य प्रस्थापित करेल, समता, बंधुता, अध्यात्मिक लोकशाही निर्माण करेल. अशी एक विचारधारा घेऊन सर्वसामान्य लोकांच्या भाषेत वाङ्मय निर्माण करेल अशा भक्तिपंथाची गरज महाराष्ट्राला होती. ही काळाची आणि मराठी अस्मितेची गरज संतांनी उभारलेल्या भक्तिपंथाने आणि त्यांच्या उत्तुंग अनुभूतीतून आलेल्या संत वाङ्मयाने बऱ्याच प्रमाणात भागवली. तसेच या संतांनी जीवन जगण्याची विवेकबुद्धीही समाजास दिली.

प्रस्तावना:-

संत आणि त्यांच्या कार्यासंबंधी प्रा.गं.बा.सरदार म्हणतात, "मध्ययुगीन समाजाच्या शरीरात साठलेले जडत्व आणि विस्कळीतपणा यांच्याविरुद्ध उसळलेली प्रतिक्रिया म्हणजेच हे प्रबोधन होय."

प्रबोधन हे उद्बोधनातून साकारते आणि यातूनच मानवी प्रगती होते. म्हणून संतांनी समाजास नीत शिकवण्याचा ध्यास सातत्याने घेतलेला दिसून येतो. परिवर्तन हा शब्दच मुळात परि + वर्तन = म्हणजेच जोडण्यायोग्य नियम आणि जीवनवृत्ती. जीवनात योग्य जुळवाजुळव करणारा नियम व्यक्ती-समाजाला प्रगतीप्रथावर पोहचवत असतो. मानवी जीवन हे परिवर्तनीय असते, असावे लागते, त्याच्या जीवन जगण्याच्या पद्धती बदलल्या पाहिजेत. याबाबत भारतीय विचारधारेच्या परिप्रेक्ष्यातून विचार केल्यास असे निदर्शनास येते की, भारतात प्राचीन काळापासून वैदिक आणि अवैदिक साहित्य परंपरा व विचारधारा अस्तित्त्वात होती. वैदिक परंपरेचे पुरस्कर्ते उच्चवर्णीय सत्ताधारी होते तर या परंपरेतील तत्त्वज्ञान परमात्मा-आत्मा, वर्ण-धर्म-कर्म, जाती, अध्यात्म, स्वर्ग-नरक, जप-तप, जन्म-पुनर्जन्म, पाप-पुण्य यांना महत्त्व देते. अवैदिक परंपरेत स्वातंत्र्य-समता-बंधुता, न्याय, नीती, बुद्धी प्रामाण्यवाद, प्रयत्नवाद, वैज्ञानिकता, तर्कशुद्धता यावर भर आहे. ही अवैदिक विचारधारा सिंधु संस्कृतीपासून म.गौतम बुद्ध, चार्वाक, महात्मा बसवेश्वर, महात्मा जोतीबा फुले, संत तुकाराम,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेपर्यंत प्रवाहीत झालेली आहे. अलौकिकतावाद आणि लौकिकतावाद हे दोन्ही प्रवाह भारतीय दर्शन समजण्याचे प्रमुख साधने आहेत. त्यामुळे भक्तिचळवळीतील संतापैकी संत तुकारामांच्या बाबत विचार करताना काही गोष्टी लक्ष्यात घ्याव्या लागतात ते एका अभंगात म्हणतात,

वेदाचा तो अर्थ आम्हांसीच ठावा |

येरांनी वाहावा भार माथा ||

वेदातील आशयघनता समजून घेऊन त्यातील खरे वर्म शोधून ते सामान्य जनतेला सांगण्याचे कार्य त्यांनी आपल्या अभंगनिर्मितीतून केले आहे. ज्या काळात ते जगत होते, समाजातील एकरूप होत होते. आलेल्या अनुभवांचे आकलन उच्च प्रतिभेच्या चक्षूंमधून करताना ते समाजाच्या नाडीपर्यंत पोहचत होते त्यामुळेच त्यांनी आई-वडील, भाऊ, पत्नी, मुलगा यांच्या मृत्यूप्रसंगी भयाण अशा दुष्काळासारख्या अनंत यातनेतही सामाजिक परिस्थिती, विषमता, सामाजिक, धार्मिक, आर्थिक परिस्थिती यातून मनात अस्वस्थता, वैराग्य पसरून एकांतात भंडाऱ्याच्या डोंगरात साधना करून स्वतःचा शोध घेत, स्वतःशी वाद घालत, आत्मसंघर्ष करत अंतरीचे मनोगत स्वाभाविकपणे आविष्कृत केले यातूनच त्यांची अभंगगाथा म्हणजेच एक श्रेष्ठतम अशी मानवजातीला देणगी आहे. एवढेच नव्हे तर मानव्याच्या प्रगतीशीलतेला दिलेली चालनाच आहे.

संत तुकारामांनी समाजाच्या गतिशीलतेसाठी सतत समाजातील वैगूण्यांना दूर सारण्याचा प्रयत्न केला. कर्मकांड, व्रत-वैकल्य, जप-तप, गंगास्थान, यापेक्षा मानवातील सदाचरण, सद्भक्ती, वासना-विकारावर मात करण्याची शिकवण दिली. संत तुकाराम म्हणतात,

काय धोविलें बाहेरी |

मन मळले अंतरी ||

(अभंग क्र. २२६८ श्री तु. अभंगाची गाथा शा.प्र.पृष्ठ-३८७)

आली सिंहस्थ पर्वणी |

न्हाव्या भटा झाली धनी || १ ||

अंतरी पापाच्या कोडी ||

वरिवरि बोडी डोई दाढी || २ ||

(अभंग क्र. २८७० श्री तु. अभंगाची गाथा शा.प्र. पृष्ठ-४८०)

अशा अभंगातून संत तुकारामांनी समाजातील मानसिक प्रतिगामीत्वाला दूर सारण्याचा उपदेश केला आहे. संत तुकारामांनी सिंहस्थ पर्वणीच्या वेळी गोदावरी नदीच्या तीरावर अनेक साधूंना केसांचे मुंडन करताना पाहिले. यावरुन त्यांना या शूद्र कर्मकांडातील फोलपणा आणि दांभिकता उमजली. सिंहस्थ पर्वणी म्हणजे न्हाव्यांचा आणि भटजींचा फायदा आणि सर्वसामान्यांची आर्थिक दिवाळखोरी यामुळे विषय वासनेची किल्मिषं कधीही दूर होणार नाहीत. जीवनच प्रवाहीत नसेल तर त्यातून चांगले ते काय निपजणार. जीवन निर्मळ करण्यासाठी कोणतीही साबन पुरेशी नाही तर अंतःकरणातून सद्विचार-सत्संग आणि शुद्ध मतीने समाजात वावरले पाहिजे. दीन-दलित, दुःखी जनांचे दुःख ओळखून त्यांना आपलेसे केले पाहिजे. ही शिकवण म्हणजे संत तुकारामांच्या समाज भक्तीची जिवंत उदाहरणे आहेत.

पाषाण देव पाषाण पायरी |

पूजा एकावरी पाय ठेवी || १ ||

सार तो भाव सार तो भाव |

अनुभवी देव ते चि जाले ||

(अभंग क्र. २२७० श्री तु.अ. गाथा शा.प्र. पृष्ठ-३८७)

वरील अभंगातही दगडाने बनवलेल्या देवातील देवत्व भाव-अभाव यावर अवलंबून असते. अस्सल अनुभूतीच व्यक्तीला यथार्थ ज्ञान देत असते. असे तुकारामांना सांगायचे आहे. म्हणून ते पुढे म्हणतात,

नका दंत कथा येथे सांगो कोणी |

कोरडे ते मानी बोल कोण || १ ||

अनुभव येथे व्हावा शिष्टाचार |

न चलती चार आम्हांपुढे ||

निवडी वेगळें क्षीर आणि पाणी

राजहंस दोन्ही वेगळाली || २ ||

तुका म्हणे येथें पाहिजे जातीचें |

येरा गाबाळाचे काय काम || ३ ||

(अभंग क्र. ३१२८ श्री तु.अ.गाथा शा.प्र. पृष्ठ-५२३)

भाकडकथा दंतकथा, पुराणकथा यापेक्षा स्वतःला आलेले अनुभव आणि त्यातून आलेली ज्ञानाची अनुभूती श्रेष्ठ असते. अशाप्रकारे संत तुकारामांनी राजहंसासारखी डोळस दृष्टी समाजाला यावी, खरे-खोटे त्यांना समजावे असे नेहमीच म्हंटले आहे.

गाढवाचे अंगी चंदनाची उटी |

राखेसवे भेटी केली तेणे ||

माकडाचे गळा मोलाचा मणि |

घातला चावुनी टाकी थुंकोनि ||

तुका म्हणजे खळा नावडे हित |

अविद्या वाढवी आपुलें मत ||

(अभंग क्र. १०५६ श्री तु.गाथा शा.प्र. पृष्ठ-१८७)

गाढवासारख्या प्राण्याला चंदनाच्या उटण्याने धुतले तरी त्याचा स्थायी गुणधर्म तो कधीही विसरत नाही आणि राखेवर लोळून चंदनाचे महत्त्व नगण्य होते. तसेच माकडाच्या गळ्यात मौल्यवान मण्यांची माळ घातली तरी ती तोंडात घेऊन चावतो आणि थुंकूनही टाकतो. अशाच प्रकारची खलकामे करणारे लोक अविद्येने आपल्याच नाशाला कारणीभूत ठरत असतात अशा समाजातील सूक्ष्म गोष्टी संत तुकारामांनी आपल्या ज्ञानयुक्त अनुभवातून अभंगाद्वारे समाजासमोर मांडल्या आहेत.

संतांनी समाजातील जडत्व घालविण्यासाठी, सातत्याने माणसातील वाईट दुर्गुण घालविण्यासाठी अभंग रचना, कीर्तन, भजन, प्रवचन यांच्या माध्यमातून जागृती केली. दु:खाच्या मूळाशी असणाऱ्या तृष्णेवर विजय मिळवला पाहिजे हे सांगताना संत तुकाराम पुढील अभंगात म्हणतात,

काम क्रोध अहंकार नको देहीं |

आशा तृष्णा माया लज्जा चिंता काही |

(अभंग क्र. ३०२५ श्री तु.गाथा शा.प्र.पृष्ठ-५०५)

मनुष्य प्राणी जन्मतो आणि विशिष्ट काळानंतर मृत्यूही पावतो परंतु असामान्य माणसे जन्मतात स्वाभाविकपणे परंतु कार्याच्या रूपाने ते नेहमीच अमर ठरतात. असाच जीवनकाल संत तुकारामांनी या पृथ्वीवर व्यतीत केला. कुणब्याच्या कुटुंबात झालेला जन्म त्यांनी सुफळ करुन दाखविला, आपल्या प्रतिभेने समाजाला रोजच्या जगण्यातील दाखल्यांच्याद्वारे सजग बनविले. वारकरी धर्म मंदीराचे कळस होण्याचे भाग्य संत तुकारामांना लाभले त्यांची अभंगवाणी लोकोक्ती झाली आणि तुकाराम हे लोकशिक्षक झाले. अंध:कारमय कालखंडात त्यांनी हजारो माणसांच्या मनात ज्ञानज्योत पेटविली. संत ज्ञानेश्वरादी संतांचे कार्य त्यांना प्रेरणादायी ठरले. यांची जाणीवही त्यांनी सतत बाळगली म्हणूनच ते म्हणतात,

काय या संताचे मानूं उपकार |

मज निरंतर जागविती || १ ||

(अभंग क्र. १७८ श्री तु. गाथा शा.प्र. पृष्ठ-२९)

संतांनीच झोपेतून जागे केले, आत्मज्ञान प्राप्त झाले. वर्ण-जाती-भेदमुक्त विचार संत तुकारामांनी जनतेसमोर ठेवले. हजारो वर्ष जुन्या प्रथा-परंपरांना नाकारुन समता, शांती, क्षमा, परोपकार, बंधुभाव यांची महती समाजाला पटवून दिली यातिकुळास अप्रमाण ठरविले. सद्‌गुण, सद्‌विचार यांचे स्थान अढळ आहे. मुखात ज्याच्या ईश्वराचे नाव आहे आणि जो सदाचारी आहे त्याच्यापुढेच नतमस्तक व्हावे ही शिकवण त्यांनी समाजाला दिली, अगतिक समाजाला गतिमान बनविले. स्पृश्य-अस्पृश्यतेचे थोतांड ब्राह्मणनीतीचे अपत्य आहे हे त्यांनी निर्भिडपणे सांगितले. अंधश्रद्धा, बुवाबाजी, ढोंगीपणा यावर संत तुकारामांनी अभंगाद्वारे आसूड ओढले. समाजाला प्रयत्नवादी, बुद्धीवादी विचार शिकविला म्हणून ते समाजक्रांतीकारक, व्यवहारवादी आणि प्रगतीशील संवेदना व्यक्त करणारे एक महान संत कवी ठरतात.

संदर्भ ग्रंथ सूची

१. डॉ.मोहरीर ल.का., संत तुकारामांची जीवननिष्ठा (पहिली आवृत्ती)
२. चित्रे दिलीप पुरुषोत्तम, तुकोबांचे वैकुंठगमन, (पहिली आवृत्ती-शब्दालय प्रकाशन)
३. श्री तुकारामबावांची अभंगगाथा (शासकीय प्रत-द्वितीय आवृत्ती)
४. माटे श्री.म., संत पंत व तंत (द्वितीय आवृत्ती, पृष्ठ क्र.१३३, १३५, स्नेहवर्धन प्र.)
५. डॉ.भिंगारकर कृ.ज्ञा., संत तुकाराम आणि संत कबीर (प्रथमावृत्ती, स्नेहवर्धन प्रकाशन)
६. देसाई एस.जी., भारतीय तत्वज्ञान वैचारिक आणि सामाजिक संघर्ष
७. जाधव मनोहर, प्रबोधन आणि परिवर्तन
८. सरदार गं.बा., संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती (चौथी आवृत्ती, पृ.२२, लोकवाङ्मयगृह)